जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 JUL 2021
पुढारी

# विद्यापीठात आज रेशीमशास्त्रातील संधी विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इन्क्युबेशन इन शेरीक्लचर अँड मॅफको यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ८) रेशीमशास्त्रातील संधी या विषयावर ऑनलाईन आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

वेबिनारचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. इराण अॅग्रो इंडस्ट्रीयल ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक सय्यद मोहम्मद अली मोसवी हे मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ऑनलाईन वेबिनारमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन समन्वयक डॉ. ए. डी. जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUL 2021
पुढारी

संक्षिप्त

# विद्यापीठ कौशल्य उद्योजकता विकास केंद्रातर्फे १२ जुलैपासून ऑनलाईन व्याख्यानमाला

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व शिवाजी विद्यापीठ सेवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य व मानसिक ताणतणाव या विषयावर १२ ते १६ जुलै या कालावधीत सायंकाळी ४ ते ५ या वेळेत ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेंतर्गत डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे 'कोव्हिड-१९ मध्ये तणावाचे व्यवस्थापन', डॉ. श्वेतलिना बकरे-पाटील यांचे 'आरोग्य व आहार', तर 'मानसिक व शारीरिक आरोग्य' विषयावर अरविंद पालके तसेच 'परस्पर व्यक्ती संबंध' विषयावर डॉ. कृष्णा पाटील आणि डॉ. ए. एम. गुरव हे 'कुटुंबाचे आर्थिक नियोजन' विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. ऑनलाईन व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUL 2021
पुढारी

# महाविद्यालय, पदव्युत्तर अभ्यासक्रम परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२१ उन्हाळी परीक्षाअंतर्गत महाविद्यालय व पदव्युत्तर विभागामध्ये प्रचलित पद्धतीनुसार ऑनलाईन परीक्षा अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. विद्यापीठाने परीक्षेसाठी अर्ज करण्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा सर्टिफिकेट, बी.व्होक, वायसीएसआरडीकडील अभ्यासक्रम व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्स्टाईल, बी.टेक, विधी, एमबीए या अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी १४ जुलैपर्यंत नियमित शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे. २६ जुलै अतिविलंब शुल्कासह अर्जाची मुदत आहे. १७ ते २८ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांच्या परीक्षा याद्या महाविद्यालयांनी विद्यापीठात सादर करायच्या आहेत. परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने विद्यार्थ्यांनी मोबाईल नंबर व ई-मेल आयडी महाविद्यालयात अपडेट करावेत, असे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUL 2021
तरुण भारत

# विद्यापीठातर्फे १२ रोजी आरोग्य विषयावर व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, कौशल्य व उद्योजगता विकास केंद्र व शिवाजी विद्यापीठ सेवकसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार १२ जुलै रोजी आरोग्यविषयी ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कोरोना कालावधीत कुटुंबाचे आरोग्य कसे जपावे, मानसिक ताणतणाव आदी विषयावर मार्गदर्शन केले जाणार आहे. या व्याख्यानाची लिंक रविवार ११ जुलै रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.